# मुक्त विद्यापीठात आता ऑनलाइन प्रवेश

**Sakal, Tuesday, January 19, 2010**

नाशिक - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ एम.के.सी.एल.च्या मदतीने अनेक उपक्रम राबवीत असून, आता लवकरच सर्व अभ्यासक्रमांना ऑनलाइन प्रवेश देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाने कागद आणि पर्यायाने पर्यावरण वाचविण्याच्या उद्देशाने कागद बचाव मोहीम हाती घेतली असून, प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन करण्याबरोबरच उत्तर पुस्तिकांची पानेदेखील कमी करण्यात येणार आहेत.

विद्यापीठाने माहिती संवाद यंत्रणेचा दैनंदिन कामकाजाशी मेळ घालताना त्यातून कामकाज सुलभ व्हावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. एम.के.सी.एल.च्या मदतीने ऑनलाइन प्रवेशपद्धती राबविण्यात येणार आहेत. एम.के.सी.एल.च्या केंद्रांवर कोणत्याही अभ्यासक्रमासाठी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, या केंद्रांवर अर्जासमेवत ज्या कागदपत्रांची गरज आहे, त्याची पडताळणी केल्यानंतर अर्ज भरून घेतले जातील. त्याचप्रमाणे प्रवेश अर्ज समवेत धनाकर्ष भरण्याऐवजी ऑनलाइन बॅंकिंगची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे धनाकर्ष विद्यापीठाकडे येण्यास होणारा विलंब टाळता येईल. बॅंकेत थेट रक्कम झाल्यानंतर व्याजही जादा मिळू शकणार असल्याचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांनी सांगितले. एम.के.सी.एल.च्या माध्यमातून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या शोधण्यासही मदत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अर्थात आधी प्रक्रियेतील प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. कागद वाचविल्यास झाडे वाचतील आणि त्यातून पर्यावरणाला पोषक वातावरण राहील या उद्देशाने विद्यापीठाने कागद बचतीवर भर दिला आहे.

उत्तरपुस्तिकेत 32 पाने असली तरी अपवादानेच एखादा विद्यार्थी इतक्या पानांचा वापर करतो. त्यामुळे उत्तर पुस्तिकांच्या पानांमध्ये कपात करण्यात येणार आहे. 32 पानी पुस्तिका 28 पानांवर, 28 पानांची पुस्तिका 24, तर 24 पानी पुस्तिका 20 पानी करण्यात येणार आहे. कागद बचतीबरोबरच विद्यापीठाचे त्यासाठी खर्च होणारे 20 ते 25 लाख रुपये वाचू शकतील, असेही कुलगुरूंनी सांगितले. याशिवाय विद्यापीठाने नियमित यंत्रणेत कोणत्याही खर्चाशिवाय काही बदल केले असून, त्यातून विद्यापीठाचे दहा कोटी रुपये वर्षाला वाचू शकतील, असेही कुलगुरूंनी सांगितले.